# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/१०२८
दिनांक : १९.११.२०२४

**प्रति,**
राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक,
मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे शहर.

**विषय : ''संविधान दिवस पदयात्रा –२६ नोव्हेंबर, २०२४ गौतम बुद्ध उद्यान वरळी सी. फेस ते चैत्यभूमी, दादर या शासकीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक पाठविणे बाबत.''**

**संदर्भ :** नैयुकस/महा-गोवा/संविधान दिवस पदयात्रा/२०२४–२५/५२६,
दिनांक १२.११.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास अवगद आहे की, नेहरू युवा केंद्र संगठन, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार दिनांक २६.११.२०२४ रोजी भारतीय राज्यघटनेला आपल्या भारतीयांनी अंगीकृत करून ७५ वर्ष होत असल्यानिमित्त राष्ट्रीय स्तरावर राबविण्यात येत असलेल्या अभियानाअंतर्गत ''संविधान दिवस पदयात्रा कार्यक्रमांचे देशभर आयोजन केंद्र शासनाद्वारा राज्यांच्या राजधानी स्थळी दि. २६.११.२०२४ रोजी करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचाच भाग म्हणून मुंबई येथे ''संविधान दिवस पदयात्रा'' कार्यक्रमाचे आयोजन दि. २६.११.२०२४ रोजी सकाळी ०७.३० वा. करण्यात आले आहे.

सदर पदयात्रेचा तपशील खालीलप्रमाणे.

भगवान गौतम बुद्ध उद्यान, वरळी सी.फेस (Gathering) डावीकडे नमन बिल्डींग – पोदार हॉस्पिटल (पीटर चौक) डॉ. ॲनी बेझेंट रोड– साटम चौक.धर्मादास आयुक्त भवन भारत पेट्रोल पंप–नॅब वर्कशीप फॉर द ब्लाइंड्स – बॅक ऑफ बरोदा – चंद्रसेन कांबळे चौक, बाबासाहेब वरळीकर चौक–स्वा. सावरकर मार्ग–पंजाब नेशनल बॅक–गॅमन इंडिया – श्री. सिद्धीविनायक मंदिर इंडियन ऑइल पेट्रोल पंप – आर्किटेक्ट विद्याधर म्हात्रे चौक – चैत्यभूमी (समारोप).

सदर पदयात्रेसाठी आपल्या विभागांतील १५० स्वयंसेवक दि. २६.११.२०२४ रोजी सकाळी ठिक स.०७.१५ वा. भगवान गौतम बुद्ध उद्यान, वरळी सी.फेस येथे पाठविण्यात यावे हि विनंती

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**